लोकमत पु. पान क्र. ०१

## लाखोंचे मेफेड्रोन केले जप्त

नालासोपारा : फन फियस्टा मल्टिफ्लेक्सच्या बाजूकडून पाटणकर पार्क सिग्नलकडे जाणाऱ्या रोडवर दुचाकीवरून जाणाऱ्या आरोपीकडून शुक्रवारी संध्याकाळी नालासोपारा पोलिसांनी लाखो रुपयांचा मेफेड्रोन हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. आरोपी मलिक हुसेन (३४) याने स्वतजवळ ६ लाख ८० हजार रुपये किमतीचा मेफेड्रोन विक्रिसाठी बाळगलेला सापडला. नालासोपारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## दोन मैत्रिणींचे अपहरण



नालासोपारा : विरारच्या साईनाथनगर परिसरात राहणाऱ्या १२ वर्षाच्या दोन मैत्रिणींचे अपहरण झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे.

घटनेच्या दिवशी दोघी मैत्रिणी कोणाला काहीही न सांगता घरातून बाहेर गेल्या, त्या अद्याप परतल्या नाहीत. घरच्यांनी आजूबाजूला, मित्रमैत्रिणी, नातेवाईक यांच्याकडे शोध घेतला, पण त्या सापडल्या नाहीत. शेवटी मुलीच्या आईने शनिवारी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अज्ञात आरोपीने कसलेतरी आमिष दाखवून अपहरण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

## मारहाण करून जबरी चोरी




नालासोपारा : टाकीपाड्याच्या शिवम संकुल अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या आलोक तिवारी (१९) याला मारहाण करून त्याच्या खिशातून पैसे, मोबाइल मारहाण करून जबरीने चोरी केल्याची घटना घडली आहे. शनिवारी पहाटे अलायन्स हॉस्पिटलच्या रस्त्यावरील इमारती जवळून जाताना दोघांपैकी एकाने त्याला पाठीमागून पकडले. ठोशाबुक्क्यांनी मारहाण करून तोंडावर मारले. दुसऱ्याने त्याच्या खिशातील मोबाइल आणि रोख रक्कम असा एकूण १३ हजारांचा मुद्देमाल जबरीने चोरी करून रेल्वे स्टेशनकडे पळून गेले. तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## वसईत ९९ गावपाड्यांना ४४ टँकरद्वारे पाणीपुरवठा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : यंदा उन्हाळ्याच्या तोंडावर वसई पूर्वकडील ९९ गावपाड्यांच्या घशाला कोरड पडली आहे. त्यासाठी मनपा प्रशासनाकडून ४४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाच्या झळांसह पाणीटंचाईच्या झळाही ठिकठिकाणी वाढू लागल्या आहेत. त्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण होऊन नागरिकांना वणवण फिरावे लागत आहे. सध्या वसई पूर्वेतील ९९ गावपाड्यांना ४४ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

### उन्हाची दाहकता

यंदाही वसईतील सातिवली, चिंचोटी, कामण, खंडीपाडा व परिसरातील गावपाड्यांना मार्च महिन्यापासून टंचाईला सुरुवात होते. यावेळेस उन्हाची दाहकता अधिक असून त्याचा नागरिकांना त्रास होत आहे. अशात पाणीटंचाईने डोके बाहेर काढल्याने वसईतील नागरिक आणखीच हैराण झाले आहेत. मे महिन्यात जलस्रोत तळ गाठून पाणीटंचाईची समस्या आणखीच उग्र रूप धारण करेल, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे वसईतील गावपाड्यांना मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

लोकमत पु. पान क्र. ०२

## हजारोंचे अमली पदार्थ जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगाव पोलिसांनी टिवरी गाव येथील नवकार बिल्डिंगच्या समोरील चाळी जवळ गुरुवारी संध्याकाळी अंमली पदार्थ पकडला आहे. आरोपी शानू कुरेशी (२८) याला ताब्यात घेऊन पोलिसांनी झडती घेतल्यावर ५० हजाराचा एमडी हा अमली पदार्थ विक्रिच्या उद्देशाने साठवलेला आढळला. पोलिसांनी आरोपीकडून दुचाकी, मोबाईल असा १ लाख १० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. नायगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

CamScanner

लोकमत पू. पान. क्र. ०२

# मागच्या निवडणुकीत दाखल गुन्ह्यांचे पुढे नेमके काय झाले?

## लोकसभेसह विधानसभेतील सर्व गुन्ह्यांचे दोषारोपपत्र न्यायालयात

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : २०१९ मध्ये झालेल्या पालघर लोकसभा निवडणुकीत एकूण १९ गुन्हे दाखल झाले होते. याबाबत सर्व गुन्ह्यांचे दोषारोपपत्र पाठवले आहे, तर विधानसभेत २४ गुन्हे दाखल केले होते. यातही सर्व गुन्ह्यांचे दोषारोपपत्र न्यायालयात पाठविण्यात आले आहे.

देशातील निवडणुका शांततेत व्हाव्यात, म्हणून आचारसंहिता लागू आहे. निवडणुकीत सहभागी होणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी, उमेदवारांनी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी त्याचे पालन करणे महत्त्वाचे असते. अन्यथा आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल होतो. आचारसंहिता भंग करणाऱ्या उमेदवारावर निवडणूक लढविण्यावर बंदी येऊ शकते.




### लोकसभा निवडणुकीत दाखल झाले होते १९ गुन्हे

पालघर लोकसभा निवडणुकीत २०१९ मध्ये एकूण १९ गुन्हे दाखल करण्यात आले होते. यातील १९ गुन्ह्यांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली आहे.

### प्रदीप शर्माविरुद्ध विधानसभेत गुन्हा दाखल

नालासोपारा विधानसभा निवडणुकीत निळेगाव येथे सेना उमेदवार आणि इन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांनी मतदारांना पैसे वाटप केल्याचा आरोप झाल्यावर गदारोळ झाला होता. मोठा पोलिस बंदोबस्त नेमला होता. नालासोपारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### विधानसभेला २४ गुन्हे दाखल, सर्व प्रकरणांत चार्जशीट

विधानसभा निवडणुकीत पोलिसांनी २४ गुन्हे दाखल केले होते. या २४ गुन्ह्यात दोषारोपपत्र न्यायालयात हजर केले आहे.

### आचारसंहितेचे पालन गरजेचे

निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या आचारसंहितेचे पालन करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्यानुसार आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

\- प्रवीण बनगोसावी, जनसंपर्क अधिकारी

# दुचाकी पायावरून नेली, वरून मारहाणही केली

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : दुचाकी पायावरून नेली, वर मारहाणही केल्याची घटना मीरा-भाईंदरमध्ये घडली आहे. २८ एप्रिल रोजी रात्री नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिस ठाण्याजवळ श्री न्यू अंकिता इमारतीत राहणारे मेघेश पाटील (४८) हे त्यांची पत्नी माधुरी व मुलगा पुष्करसह नवघर मार्गावर कपडे खरेदीला चालले होते. चालत असताना श्रीराम ज्वेलर्सजवळ जयप्रकाश रामधनी जयस्वाल (३०, रा. जय अंबेनगर) हा आपली दुचाकी घेऊन आला आणि मेघेश यांच्या पायावरून दुचाकी नेली. मेघेश यांनी जयस्वाल याला विचारणा केली असता जयस्वाल याने, "तू थांब.. तुला दाखवतो," अशी धमकी देऊन गेला. नंतर तो त्याचा मोठा भाऊ दिनेश जयस्वाल (वय ३५) तसेच आणखी ३ ते ४ जणांना घेऊन आला. त्यांनी मिळून मेघेश यांना ठोशाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली.

CamScanner
CamScanner

लोकमत पु. पान क्र. ०५

# वसईत शाळांच्या जागांवर उभारल्या अनधिकृत चाळी

## राखीव भूखंडावर कुंपण करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई -विरार शहर पालिकेच्या हद्दीत शाळांसाठी एकूण ७६ भूखंड राखीव असताना या भूखंडांवर मनपाची स्वतःची एकही मालकी शाळा नसल्याचे उघड झाले आहे. गरिबांच्या मुलांना शिक्षणाच्या गंगोत्रीत आणून त्यांनाही मोफत शिक्षणाचा लाभ मिळावा यासाठी या शाळांच्या निर्मितीचा उद्देश असताना शाळांसाठी राखीव असलेल्या भूखंडांवर मात्र मोठ्या प्रमाणात अनधिकृत चाळींच्या बांधकामांनी डोके बाहेर काढले आहे.

गरीब पालकांना त्यांची मुले इंग्रजी शाळेत पाठवणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. अशा वेळी मनपाच्या हद्दीत राखीव भूखंडांवर मनपाला गरीब मुलांसाठी शाळा उभ्या करणे जास्त आवश्यक बाब वाटायला हवी होती. मात्र, तसे पालिकेच्या लेखीच नाही. दरम्यान, जूचंद्र ६, राजावली ५, चंदनसार ५, गोखिवरे ४ अशा विविध ठिकाणी शाळांसाठी आरक्षण आहे. मात्र, या भूखंडांवर अनधिकृत चाळींची बांधकामे झाली आहेत.

शाळांसाठी राखीव भूखंडांवर पालिकेने तत्काळ कुंपण करून त्या जागा बंदिस्त कराव्यात, तसेच ज्या भूखंडांवर चाळींचे अतिक्रमण झाले आहे ते अतिक्रमण तत्काळ हटवावे, अशी मागणी होत आहे.

पुण्यनगरी पु. पान क्र. ०९

# ऑनलाइन फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून दिली

मीरा रोड : नवघर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या महिलेची क्रेडिट कार्ड द्वारे ऑनलाईन १,८७,२०६ रुपयांची फसवणूक करण्यात आली होती.फसवणूक करण्यात आलेली रक्कम सायबर पोलिसांनी तपास करून परत मिळवून दिली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नवघर पोलीस ठाणे हद्दीतील तक्रारदार वृषाली यांना क्रेडिट कार्ड विभागातून बोलत असल्याचे सांगून अनोळखी मोबाईल धारकाने फोन केला. क्रेडिट कार्डाचे व्यवहार सुरळीत चालू ठेवण्यासाठी तक्रारदार यांना कार्डाची माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी कार्डाची माहिती दिली असता त्यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यातून २,०६,१५३ रुपये कपात झाल्याचा मॅसेज आल्याने त्यांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची तत्काळ दखल घेवून तक्रारदार यांच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. त्यावेळी फसवणूक झालेली रक्कम रिलायन्स रिटेल पेटीम या मर्चंड च्या अकाऊंटवर गेल्याचे दिसून आले.



CamScanner

पुढारी पु पान क्र. ०१

## सतरा वर्षाच्या मुलाची आत्महत्या

**पालघर :** एका १७ वर्षे वयाच्या मुलाने आत्महत्या केल्याची घटना नालासोपारा पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. निलगंगा आपारमेंट मध्ये राहणारा हा मुलगा आहे. घरातील पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेत त्याने आत्महत्या केल्यानंतर शनिवारी याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## अश्लील चाळे; दाखल गुन्हे

**पालघर:** अश्लील हावभाव करून पुरुषांना आकर्षित करणाऱ्या तीन महिला विरोधात माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. या महिला वसई पश्चिमेच्या उड्डाणपुलावर शनिवारी अश्लील अंग प्रदर्शन करून पुरुषांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत होत्या. माणिकपूर पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी या ठिकाणी पोचून तीन महिलांना ताब्यात घेत त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## पेल्हारमध्ये पंधरा लाखांचा गुटखा जप्त

**पालघर :** पेल्हार पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये तब्बल १५ लाख ४३ हजारांच्या जवळपास चा गुटखा पोलिसांनी जप्त केला आहे. राम गिरी, उमेश जयस्वाल व पिंटू जयस्वाल या तिघांविरोधात या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. हा बेकायदा गुटखा राम लखन चाळीमध्ये विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवला होता. पोलिसांना ही माहिती मिळताच गुरुवारी त्यांनी धाड टाकून हा गुटखा जप्त केला व कारवाई केली.

पुढारी पान क्र. ०५

# नालासोपाऱ्यात सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

## महिलेला अटक; तीन महिलांची वेश्याव्यवसायातून सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा पूर्वेच्या कॅपिटल मॉल जवळ अवैध वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या एक महिला आरोपीला अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांनी अटक केली आहे. तिच्या तावडीतून वेश्याव्यवसायातून तीन महीलांची सुटका केली आहे.

आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील पंचकर्मा बॉडी केअर, शॉप नं.९, यशवंत विया टाउनशिप, कॅपिटल मॉलजवळ नालासोपारा पूर्व या ठिकाणी एक महिला वेश्यादलाल ही वेश्यागमनासाठी मुली पुरवीत असल्याची माहीती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेच्या पोलीस निरीक्षक सौरभी पवार यांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार त्या ठिकाणी बोगस गिऱ्हाईक पाठवून शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख ही स्पामध्ये वेश्यागमनासाठी मुली पुरविते. ती एका मुलीचे मसाज व वेश्यागमनाचा मोबदला म्हणून ४००० रु. घेत असल्याची माहिती मिळाली. खात्री पटताच पोलीस पथकाने दोन पंचासह त्या ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक महिला दलाल आरोपी शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख (२४) हीला ताब्यात घेतले. व तीन महीला पिडीत महिलांची वेश्याव्यवसायातून सुटका केली आहे. यातील वेश्यादलाल शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख हीने पिडीत महिलांना पैशाचे आमिष दाखवून वेगवेगळ्या ग्राहकांना बोलावुन त्यांच्याकडून पैसे घेवून पिडीत महिला यांना वेश्याव्यवसाय करण्यास लावते. वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महिलेचे ४००० रु. घेते व त्यातील काही पैसे पिडीत महीलांना देत असल्याची माहिती मिळाली. महिला दलाल आरोपीला अटक करून आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

CS CamScanner

पुढारी पु पान क्र. ०१

## सतरा वर्षाच्या मुलाची आत्महत्या

पालघर : एका १७ वर्षे वयाच्या मुलाने आत्महत्या केल्याची घटना नालासोपारा पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. निलगंगा आपारमेंट मध्ये राहणारा हा मुलगा आहे. घरातील पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेत त्याने आत्महत्या केल्यानंतर शनिवारी याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## अश्लील चाळे; दाखल गुन्हे

पालघर: अश्लील हावभाव करून पुरुषांना आकर्षित करणाऱ्या तीन महिला विरोधात माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. या महिला वसई पश्चिमेच्या उड्डाणपुलावर शनिवारी अश्लील अंग प्रदर्शन करून पुरुषांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत होत्या. माणिकपूर पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी या ठिकाणी पोचून तीन महिलांना ताब्यात घेत त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## पेल्हारमध्ये पंधरा लाखांचा गुटखा जप्त

पालघर : पेल्हार पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये तब्बल १५ लाख ४३ हजारांच्या जवळपास चा गुटखा पोलिसांनी जप्त केला आहे. राम गिरी, उमेश जयस्वाल व पिंटू जयस्वाल या तिघांविरोधात या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. हा बेकायदा गुटखा राम लखन चाळीमध्ये विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवला होता. पोलिसांना ही माहिती मिळताच गुरुवारी त्यांनी धाड टाकून हा गुटखा जप्त केला व कारवाई केली.

पुढारी पान क्र. ०५

# नालासोपाऱ्यात सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

## महिलेला अटक; तीन महिलांची वेश्याव्यवसायातून सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा पूर्वेच्या कॅपिटल मॉल जवळ अवैध वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या एक महिला आरोपीला अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांनी अटक केली आहे. तिच्या तावडीतून वेश्याव्यवसायातून तीन महीलांची सुटका केली आहे.

आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील पंचकर्मा बॉडी केअर, शॉप नं.९, यशवंत विया टाउनशिप, कॅपिटल मॉलजवळ नालासोपारा पूर्व या ठिकाणी एक महिला वेश्यादलाल ही वेश्यागमनासाठी मुली पुरवीत असल्याची माहीती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेच्या पोलीस निरीक्षक सौरभी पवार यांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार त्या ठिकाणी बोगस गिऱ्हाईक पाठवून शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख ही स्पामध्ये वेश्यागमनासाठी मुली पुरविते. ती एका मुलीचे मसाज व वेश्यागमनाचा मोबदला म्हणून ४००० रु. घेत असल्याची माहिती मिळाली. खात्री पटताच पोलीस पथकाने दोन पंचासह त्या ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक महिला दलाल आरोपी शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख (२४) हीला ताब्यात घेतले. व तीन महीला पिडीत महिलांची वेश्याव्यवसायातून सुटका केली आहे. यातील वेश्यादलाल शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख हीने पिडीत महिलांना पैशाचे आमिष दाखवून वेगवेगळ्या ग्राहकांना बोलावुन त्यांच्याकडून पैसे घेवून पिडीत महिला यांना वेश्याव्यवसाय करण्यास लावते. वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महिलेचे ४००० रु. घेते व त्यातील काही पैसे पिडीत महीलांना देत असल्याची माहिती मिळाली. महिला दलाल आरोपीला अटक करून आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner
CamScanner

पुढारी पान . क्र. ०४

# वसईत विकासकामांच्या नावाखाली करदात्यांच्या पैशांची लूट?

## पालिका प्रशासनाविरोधात भाजपाचे शशिकांत दुबे यांचा आरोप

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई विरार शहर महानगरपालिका स्थापनेपासून भ्रष्टाचाराबाबत चर्चेत आहे. अलीकडे विकासाच्या नावाखाली सुशोभीकरणापासून ते रस्ते दुरुस्ती, गटारींसंदर्भातची कामे केली जात आहेत. अशा स्थितीत महापालिकेने या कामांसाठी करोडो रुपयांच्या निविदा काढल्या आहेत. दरम्यान, कोट्यवधी रुपयांच्या रस्ता दुभाजकाच्या कामाबाबत भाजप वसई विरार जिल्हा सचिव शशिकांत दुबे यांनी वसई विरार शहर महानगरपालिका आयुक्तांसह अनेक अधिकाऱ्यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे की वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच मध्ये माणिकपूर नाका ते मॅकडोनाल्ड भाबोला या रस्त्याच्या दुभाजकाच्या बांधकामासाठी १,९१,१३,४३५ रुपयांची निविदा ११ नोव्हेंबर २०२२ रोजी काढण्यात आली आहे. या ठिकाणी दुभाजक आधीच अस्तित्वात असल्याचे सांगितले जाते, याशिवाय दुभाजकात पूर्वीपासून शोभिवंत झाडे आहेत. डिव्हायडरमध्ये लावलेल्या रोपांची देखभाल करण्यासाठी महापालिका लाखो रुपये खर्च करते. आता नवीन दुभाजक करण्यासाठी कंत्राटदार ही झाडे तोडत असून, दुभाजक बनवल्यानंतर या दुभाजकात पुन्हा शोभेची झाडे लावण्यासाठी व्हीव्हीसीएमसी लाखो रुपये खर्च करणार आहे. दुबे म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याने स्वत:च्या आणि ठेकेदाराच्या फायद्यासाठी निविदा काढल्या आणि ठेकेदाराच्या संगनमताने ती मंजूर केली आहे. तरी आयुक्तांना नम्र विनंती आहे की, सदर कामाची निविदा तात्काळ रद्द करून मनपाचा पैसा वाचवावा व खरच गरज आहे तिथे खर्च करावा. या प्रकरणाची प्रशासनाने आपल्या स्तरावर सखोल चौकशी करून भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, असे दुबे म्हणाले. वरील निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली आहे असेही दुबे यांचे मत आहे.

# नालासोपारा-आचोळे तलावाला मरणकळा

## सरोवर संवर्धन योजनेची अंमलबजावणीच नाही

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

महानगरात वाढत्या लोकसंख्येमुळे तलाव, नदी, सरोवर अशा नैसर्गिक घटकांवर पर्यावरणात्मकदृष्ट्या परिणाम होत आहेत. महानगरातही नैसर्गिक सौंदर्य राखले जावे, पर्यावरणाचा समतोल ढासळू नये, यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना सुरू केली आहे. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत तलावांचे संवर्धन होणार असून यासाठी ३० टक्के हे राज्य सरकार आणि ७० टक्के निधी केंद्र शासन देणार आहे. मात्र केंद्र सरकारच्या या योजनेची अंमलबजावणी वसई-विरार महापालिकेने अद्याप केलेली नसल्याने वसई-विरार महापालिका क्षेत्रातील तलावांना मरणकळा आली असून आचोळे तलावाचे संवर्धन करण्याची मागणी शिवसेना पदाधिकारी भावेश महाडिक यांनी केली आहे.



तलावांचे पुनरुज्जीवन व्हावे, त्यांचा ऐतिहासिक वारसा जपला जावा, पर्यावरणाचे संरक्षण व्हावे, दुर्मीळ पक्ष्यांचे वास्तव्य टिकावे, मत्स्यसंवर्धन व्हावे, वृक्ष लागवड व्हावी, ही या योजनेचे उद्दिष्ट आहे. वसई-विरार महापालिकेच्या नकाशी प्रभागांत ११० तलाव आहेत. यातील ३० तलावांची देखभाल ही उद्यान विभागाच्या माध्यमातून वचत गट करतात. तर उर्वरित ८० तलाव हे मत्स्यसंवर्धन आणि जतन यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. वसई-विरार शहरात असलेले तलाव व पाणथळे ही नैसर्गिक ठेवा मानली जातात. मात्र यातील बहुतांश तलावांची आज दुर्दशा झालेली आहे. तलावांच्या सुशोभीकरणाकरता पालिकेने कोट्यवधी रुपयांची तरतूद केलेली आहे.

नालासोपारा-आचोळे तलाव सध्या अशाच मरणकळांतून जात आहे. या तलावाचा नैसर्गिक ढाचा खचला आहे. तलावाशेजारी असलेले पेव्हरब्लॉक उखडले असून, तलावात प्लास्टिक आणि अन्य कचऱ्याचा खच साचलेला आहे. याचे परिणाम म्हणून तलावाचे पाणी दूषित होऊन त्यातील मत्स्यजीवांना धोका निर्माण झालेला आहे. याबाबत अनेकदा तक्रारी करूनही पालिका दखल घेत नाही, अशी माहिती शिवसेना नालासोपारा शाखाप्रमुख भावेश महाडिक यांनी दिली. विशेष म्हणजे नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पातही तलावांच्या देखभाल-दुरुस्तीकरता महापालिकेने तरतूद केलेली आहे. मात्र त्यानंतरही या तलावाच्या सुशोभीकरणाला मुहूर्त सापडलेला नाही. पालिकेने या तलावाचे सुशोभीकरण तातडीने करावे व तलावाचे प्रदूषण रोखावे, अशी मागणीही भावेश महाडिक यांनी केली आहे.

CamScanner

पुढारी पान क्र. ४

# ५ लाख वसईकर रिक्षाप्रवाशांचा मतदानावर बहिष्कार?

## डबल रिक्षा भाडे आकारून रिक्षात ५ प्रवासी घेत होतेय लूट

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

लॉकडाऊनमध्ये राज्यात ठाकरे सरकार असताना सोशल डिस्टंगचे कारण देत वसई विरारमध्ये शेरींग रिक्षात दोन प्रवासी व डबल रिक्षा भाडे सुरू केले, आज लॉकडाऊन संपून ३ वर्षानंतर रिक्षात ५ प्रवासी व डबल रिक्षाभाडे म्हणजे प्रतिसिट २० रू.घेऊन नायगाव,वसई,नालासोपारा व विरार परिसरात प्रतिदिन सामान्य ५ लाख रिक्षा प्रवाशांची आर्थिक लुटमार केली जात आहे,हा अनधिकृत पैसा कोणाच्या घशात जात आहे? आणि याला जबाबदार कोण?

आमच्या वसई सावंतवाडी कोकण रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने मागील ४ वर्षापासून ह्या लुटमारी संदर्भात ठाणे, जिल्हाधिकारी पालघर, स्थानिक आमदार हितेंद्र ठाकूर,मिरा भाईंदर वसई विरारचे पोलीस आयुक्त, तत्कालीन पालकमंत्री दादा भुसे,माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विद्यमान पालकमंत्री रविंद्र चव्हाण, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे वारंवार सदर लुटमारी संदर्भात पाठपुरावा करूनही ४ / ४ वर्षेही मतदारांचे प्रश्न सुटत नसतील किंवा त्यांची आर्थिक पिळवणूकच होणार असेल तर अशांना मतदान का करायचे? असा साधा प्रश्न वसई विरारकरांना पडलेला आहे. सर्वसामान्य १० ते १२ हजारावर काम करणाऱ्या वसई विरारकरांनी रोज रिक्षासाठी ४० रू. आणायचे कोठून? येथील सर्व रिक्षा युनियन एकाच राजकीय पक्षाच्या आहेत. ३० वर्ष आमदार यांचे, मागील ३० वर्ष सलग येथील मनपावर त्याच पक्षाची सत्ता आहे, तरीही मतदारांना ना प्यायला पाणी, ना हॉस्पीटल, ना रस्ता आणि यावर ना सत्ताधारी बोलतात ना विरोधक, सर्वांची मिलीभगत, मग मतदान करायचे तरी कोणाला?

यासाठी आम्ही वसई विरारकर, वसई सावंतवाडी कोकण रेल्वे प्रवासी संघटना - वसई विरार व आमची पश्चिम रेल्वे - विरारसह वसई विरारमधील रोज रिक्षाने प्रवास करणारे ५ लाख रिक्षा प्रवासी येऊ घातलेल्या लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकणार आहेत.

सकाळ पु पान क्र. ०१

# क्रेडिट कार्डद्वारे महिलेची लाखो रुपयांची फसवणूक

भाईंदर, ता. २९ (बातमीदार) : क्रेडिट कार्डचे व्यवहार सुरळीत ठेवण्यासाठी कार्डाची माहिती मागून एका महिलेची दोन लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची घटना भाईंदर पूर्व येथे घडली. पोलिसांच्या सायबर विभागाने त्वरेने पावले टाकत यातील बहुतांश रक्कम महिलेस परत मिळवून दिली आहे.

नवघर पोलिस ठाण्याच्या परिसरात राहणाऱ्या एका महिलेला अनोळखी व्यक्तीने फोन करून क्रेडिट कार्ड विभागातून बोलत असल्याचे सांगितले. त्याने क्रेडिट कार्डचे व्यवहार सुरळीत सुरू ठेवण्यासाठी महिलेकडून कार्डचे तपशील मागितले. त्यानुसार महिलेने आपल्या कार्डचे तपशील संबंधित व्यक्तीला दिले. त्यानंतर काही वेळातच त्यांच्या खात्यातून दोन लाख सहा हजार १५३ रुपये वजा झाले असल्याचा संदेश त्यांना आला. त्यानंतर महिलेने सायबर पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. सायबर पोलिस ठाणे वरिष्ठ निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांच्या पथकाने झालेल्या व्यवहाराची माहिती घेतली. त्यात मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित रक्कम ज्या खात्यावर जमा झाली होती, त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला व फसवणूक झालेली रक्कम थांबविण्यात आली. त्यानंतर त्यातील एक लाख ८७ हजार २०६ रुपये महिलेच्या मूळ खात्यात पुन्हा जमा करण्यात आले.

CamScanner

लोकसत्ता पृ पान क्र. ०१

# २५८ बेकायदा सदनिकांची विक्री

## पालिकेच्या तक्रारीनंतर विकासकांवर गुन्हे दाखल

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरारमध्ये ५५ अनधिकृत इमारतींचे प्रकरण ताजे असताना देखील अनधिकृत इमारती बांधण्याचे प्रकार थांबलेले नाहीत. विरारच्या फूलपाडा येथे ४ मजल्याच्या एकूण ५ अनधिकृत इमारती बांधून त्यातील ३८ दुकाने आणि २५८ सदनिकांची विक्री केल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी इमारतीच्या विकासकावर पालिकेच्या तक्रारीनंतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मागील वर्षी विरार मध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे वसई, विरारमध्ये ११७ अनधिकृत इमारती बांधल्या गेल्याचे प्रकरण उघडकीस आले. यात शासनासह शेकडो कुटुंबांची फसवणुक करण्यात आली होती. बेकायदा इमारतींच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्जे देऊन सदनिकांची विक्री करण्यात आली होती. या प्रकरणाची व्याप्ती वसई, विरारच्या विविध भागात होती. त्यानंतर अनधिकृत इमारतींच्या प्रकरणाला आळा बसेल अशी आशा होती. परंतु आजही शहरात राजरोस अनधिकृत इमारती बांधल्या जात असल्याचे प्रकार सुरूच आहेत.

विरार पूर्वेच्या फुलपाडा येथे पालिकेची कुठलाही परवानगी न घेता ५ अनधिकृत इमारती बांधल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. फुलपाडा येथील भूमापन क्रमांक (सर्व्हे नंबर) ८६ हिस्सा नंबर १ या ठिकाणी पालिकेची कुठलीही परवानगी न घेता चार मजल्यांच्या एकूण ५ इमारती तयार करण्याच्या आल्या आहे. या अनधिकृत इमारतींमधील त्यातील ३८ दुकाने आणि २५८ सदनिकांची विक्री करून ग्राहकांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी पालिकेच्या प्रभाग समिती 'सी' (चंदनसार) चे लिपिक अशोक धानिया यांनी विरार पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी विकासक आणि जमीन मालकांविरोधात महाराष्ट्र नगर रचना प्रांतिक अधिनियम (एमआरटीपीए) च्या कलम ५२, ५३, ५४ अन्वये गुन्हे दाखल केले आहेत



### बेकायदा इमारती, सदनिका

**गोविंद गीता अपार्टमेंट-इमारत क्रमांक ८**
● ४ माळे, २ गाळे ५१ सदनिका

**गोविंद सृष्टी अपार्टमेंट इमारत क्रमांक ५**
● ४ मजली इमारत, ६ गाळे, ६७ सदनिका

**गोविंद विकास अपार्टमेंट इमारत क्रमांक ७**
● ४ मजली इमारत, १३ गाळे ४९ सदनिका

**गोविंद नेस्ट अपार्टमेंट, इमारत क्रमांक ४**
● ४ मजली इमारत १५ गाळे, ५२ सदनिका

**गोविंद पॅरेडाईज**
● ४ मजली इमारत, २ गाळे, ४० सदनिका

### या विकासकांवर दाखल झाले गुन्हे

**या प्रकरणी विरार पोलिसांनी ७/१२वर नाव असलेले जमिनिचे मालक रघुनाथ पाटील तसेच तसेच गोविंद गीता इमारतीचे विकासक मिलिंद मालुसरे आणि विकासक शेखर बापू देसाई (गोविंद एनएक्स, गोविंद पॅरेडाईज, जीएन एण्ट्रप्रायझेस, गोविंद सृष्टी) यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. विरार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अनिल म्हस्के या प्रकरणाचा तपास करत आहेत.**

# अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी उपाययोजना

## बीट निरीक्षकांची नियुक्ती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी वसई-विरार महापालिकेने आक्रमक भूमिका घेतली आहे. दररोज कारवाई करण्याबरोबरच अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवण्यासाठी बीट निरीक्षकांची नियुक्ती तसेच मासिक अहवाल सादर करणे साहाय्यक आयुक्तांना बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय बंद पडलेल्या बीट चौक्या नव्याने कार्यान्वित केल्या जाणार आहे.

सर्वाधिक बांधकामे हे नालासोपारा, वसई, विरार, नायगाव येथे सुरू आहेत. शहरातील वाढती अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी काय उपाययोजना करता येतील त्यासाठी अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी नुकत्याच एका बैठकीचे आयोजन केले होते.

त्यानुसार आता अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवण्यासाठी बीट निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे बीट निरीक्षक अनधिकृत बांधकामांची पाहणी करून त्याचा अहवाल साहाय्यक आयुक्तांना सादर करणार आहेत. त्या अहवालानुसार तात्काळ साहाय्यक आयुक्त कारवाई करणार आहेत.

याशिवाय दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी प्रत्येक प्रभागात अनधिकृत बांधकामावर केलेल्या कारवाईचा तपशील सादर करावा लागणार आहे, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त (अतिक्रमण) अजित मुठे यांनी दिली.

### बीट चौक्या कार्यान्वित करणार

**अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी पालिकेने तीन ठिकाणी बीट चौक्या उभारल्या होत्या. तेथे पालिकेने कर्मचारी नियुक्त केले होते. हे कर्मचारी अनधिकृत बांधकामांची माहिती साहाय्यक आयुक्तांना पोहोचवत होते. त्यामुळे बांधकाम सुरू असतानाच पालिकेला कारवाई करणे शक्य व्हायचे, परंतु या बीट चौक्या संकल्पना बंद पडली होती. त्यामुळे आता नव्याने बीट चौक्या कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आल्या आहेत. त्याची संख्यादेखील वाढवली जाणार आहे.**

CamScanner
CamScanner

लोकसत्ता पृ. पान. क्र ०१

# ११ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'महासंचालक पदक'

**वसई :** दहा ते पंधरा वर्षांच्या सेवाकालावधीमध्ये केलेल्या सर्वोत्तम कामगिरी बद्दल मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ११ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना 'महासंचालक पदक' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी पोलीस आयुक्त आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात येणार आहे. पोलीस सेवेत कर्तव्य बजावत असताना केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल पोलीस महासंचालक यांच्या मार्फत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मान म्हणून 'महासंचालक पदक' देऊन गौरविण्यात येते. यंदाच्या वर्षी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील २ पोलीस निरीक्षक, १ महिला सहायक पोलीस निरीक्षक, १ पोलीस उपनिरीक्षक, ३ सहायक पोलीस उपनिरीक्षक, ३ पोलीस हवालदार, १ पोलीस शिपाई अशा ११ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस महासंचालकांनी ह्य महासंचालक पदकह्य जाहीर केले आहे. गुन्हे शाखा युनिट एकचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, भरोसा सेलच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव, अनैतिक मानवी वाहतूक शाखेचे सहायक पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र पाटील, सहायक पोलीस उपनिरक्षक अशोक ईशी, अजय मांडोळे, हवालदार जयप्रकाश जाधव, आनंद मोरे, मुकेश पोरे व पोलीस शिपाई नामदेव ईश्वलकर यांचा समावेश आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचा दौरा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** विरारच्या ग्लोबल सिटी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या (एसटीपी) टाकी मध्ये साफसफाई करण्यासाठी गेलेल्या चार कामगारांचा टाकीतील विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू झाला होता. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी आता राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एम.वेकटेशन मंगळवारी विरार येथे येणार आहेत.

विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथे सांडपाणी प्रकल्प आहे.

९ एप्रिलला शुभम पारकर (२८), अमोल घाटाळ (२७) निखिल घाटाळ (२४) आणि सागर तेंडुलकर (२९) असे चार मजूर प्रकल्पाच्या टाक्यांची साफसफाई करण्यासाठी उतरले होते. त्यांचा गुदमरून मृत्यू झाला.

याप्रकरणी चौकशीसाठी नवी दिल्ली येथून राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाकडून घटनास्थळाचा मंगळवारी पाहणी दौरा केला जाणार आहे.

मुंबई

CamScanner

1997 से

# KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 27 अंक-311 मुंबई, मंगलवार 30 अप्रैल 2024 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# तीन महिलाओं को देहव्यापार की दलदल से छुड़ाया गया, महिला दलाल गिरफ्तार

**वसई:** मानव तस्करी विरोधी सेल,नालासोपारा ने नालासोपारा पूर्व में कैपिटल मॉल के पास कार्रवाई कर अवैध वेश्यावृत्ति में लिप्त एक महिला आरोपी को गिरफ्तार करने और 3 महिलाओं को मुक्त कराने में सफलता हासिल की। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी (अपराध) मदन बल्लाल के मार्गदर्शन में मानव तस्करी विरोधी सेल,नालासोपारा की पुलिस निरीक्षक सौरभी पवार की टीम ने की है।पुलिस ने कहा कि,अचोले पुलिस स्टेशन अंतर्गत 'पंचकर्मा बॉडी केअर शॉप नं.9,समर्पण सी.एच.एस,यशवंत विवा टाउनशिप,कैपिटल मॉल के पास नालासोपारा पूर्व में एक महिला वेश्यावृत्ति के लिए लड़कियों की आपूर्ति कर रही है।ऐसी गोपनीय सूचना अनैतिक मानव तस्करी शाखा की पुलिस निरिक्षक सौरभी पवार को मिली,जिसके बाद पुलिस टीम,बोगसक ग्राहक और दो पंच ने उक्त स्थान पर जाकर 27 अप्रैल को कार्रवाई की और महिला वेश्या शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख (24) को गिरफ्तार किया और तीन महिला पीड़ितों को बचाया। घटना के बारे में कहा गया कि,फर्जी ग्राहक बनाकर वह शबाना उर्फ सोनम शफीक शेख के स्पा में गया और उपरोक्त वेश्या से मिला,जानकारी के आधार पर वेश्यावृत्ति के लिए लड़की की मांग की।उस वक्त उन्होंने कहा था कि मैं एक लड़की की मसाज और प्रॉस्टिट्यूशन के बदले 4000 रुपये लेती हूं अगर आप सहमत हैं तो 4000 रुपये देकर आ सकते हैं।जब यह बताया गया तो फर्जी ग्राहक ने सिर हिलाया,बोगस ग्राहक फिर पंच के साथ 'पंचकर्मा बॉडी केअर' शॉप नं.9,समर्पण सी एच एस,यशवंत विवा टाउनशिप,कैपिटल मॉल के पास नालासोपारा पूर्व में गया। वेश्यादलाल शबाना उर्फ सोनम ने फर्जी ग्राहक को तीन महिला दिखाई और उसमें से तुम पसंद करो और मेरे कमीशन के अनुसार मुझे पैसे दो और शेड्यूल के अनुसार वेश्यावृत्ति के लिए भुगतान करो।यह बताए जाने पर कि बोगस ग्राहक ने पीआई पवार के निर्देशानुसार एक महिला को प्राथमिकता दी और छापा पंचनामा में निर्धारित अनुसार तीस पैसे का भुगतान किया,जब बोगस ग्राहक ने पुलिस टीम को इसकी पुष्टि की सूचना दी,तो वह दो पंच के साथ उस स्थान पर गए और उस स्थान पर छापा मारा और शबाना उर्फ सोनम शफीक शेख नाम की महिला दलाल आरोपी को गिरफ्तार किया गया.वहीं 3 महिला पीड़िता को वेश्यावृत्ति से मुक्त कराया गया है।पुलिस ने कहा कि,वेश्या शबाना उर्फ सोनम शफीक शेख पीड़ित महिलाओं को पैसों का लालच देकर अलग-अलग ग्राहकों को बुलाती है,उनसे पैसे लेती है और पीड़ित महिलाओं को वेश्यावृत्ति में लगाती है और वेश्यावृत्ति के लिए भुगतान और कमीशन लेती है।वह एक महिला से कुल 4000 लेती थी और उसमें से कुछ पैसे पीड़ित महिलाओं को दे देती थी।पुलिस ने कहा कि,उपरोक्त वेश्या दलाल के ऊपर अचोले थाने में केस दर्ज किया गया है।



CamScanner